# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

मुख्य प्रशासकीय इमारत,टाऊन हॉल,
छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)


जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/ 48 | दिनांक - 08/01/2024.

## जाहीर प्रगटन

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची एकूण 114 पदे भरण्याबाबतची जाहिरात जा.क्र. मनपा/आस्था-1/2023/1234. दि.18/08/2023 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील **अग्निशामक व प्रमुख अग्निशामक** या पदाची लेखी परीक्षा दि.09/12/2023 रोजी घेण्यात आली होती. सदर पदाच्या लेखी परीक्षा दिलेल्या उमेदवारांना प्राप्त झालेले गुण या महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर www.aurangabadmahapalika.org किंवा www.chhsambhajinagarmc.org मधील Recuritment 2023 (पदभरती 2023) प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरची यादी ही निवड यादी नसून फक्त उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांची माहिती दर्शविलेली आहे.

तसेच **अग्निशामक व प्रमुख अग्निशामक** या पदासाठीच्या पुढील प्रक्रियेचा भाग म्हणून शारीरिक पात्रता पडताळणी परीक्षा (लेखी परीक्षेकरिता विहित केलेले किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरतील.) घेण्यात येणार असून याबाबत सविस्तर माहिती, सूचना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

दिनांक : 08 / 01 /2024
ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

अतिरिक्त आयुक्त-1
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका